प्रेस नोट

दिनांक :- 17/04/2025

नंदुरबार जिल्हा पोलीस दलाकडून वरिष्ठ पोलीस अधिकारी व सर्व पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्यांसाठी कायमस्वरुपी अधिकृत मोबाईल क्रमांकांची सुरूवात

नागरिकांच्या सोयीसाठी आणि पोलिस व जनतेमधील संवाद सुलभ करण्याच्या दृष्टीने, नंदुरबार जिल्हा पोलीस दलाकडून जिल्ह्यातील वरिष्ठ पोलीस अधिकारी व पोलीस ठाणे / शाखा प्रभारी अधिकाऱ्यांसाठी कायमस्वरुपी अधिकृत मोबाईल क्रमांकांची सुरूवात करण्यात आली आहे. या उपक्रमाचा उद्देश नागरिकांना आपत्कालीन परिस्थितीत पोलिसांपर्यंत सुलभ व सहजतेने पोहोचता यावे यासाठी करण्यात आला आहे.

यापूर्वी पोलिस अधिकाऱ्यांशी संपर्क करण्यासाठी त्यांचे वैयक्तिक मोबाईल क्रमांकांद्वारे होत असे, परंतु अधिकारी बदली झाल्यास हे मोबाईल क्रमांक बदलत असल्याने नागरिकांना अडचणींचा सामना करावा लागतो. सामान्य नारिकांची गैरसोय टाळण्यासाठी अधिकृत मोबाईल क्रमांक पदासोबत स्थिर राहणार असून, अधिकारी बदली झाल्यास देखील मोबाईल क्रमांक तोच राहणार आहे. यामुळे नागरिकांना कोणत्याही अडथळ्याशिवाय पोलीसांशी सतत संपर्क साधता येईल.

या उपक्रमाबाबत बोलताना नंदुरबारचे पोलिस अधीक्षक यांनी सांगितले, "नागरिकाभिमुख, पारदर्शक आणि उत्तरदायी पोलिसिंगच्या दिशेने हा एक महत्त्वपूर्ण टप्पा आहे. या मोबाईल क्रमांकांच्या साहाय्याने नागरिकांना तात्काळ मदत मिळेल आणि आपत्कालीन परिस्थितीत अधिक कार्यक्षम प्रतिसाद पोलीस दलाकडून मिळेल."

हे अधिकृत मोबाईल क्रमांक जिल्हा पोलिसांच्या अधिकृत संकेतस्थळावर व अन्य सार्वजनिक माध्यमांवर प्रसिद्ध केले जातील, जेणेकरून नागरिकांना ते सहज उपलब्ध होतील. यामुळे केवळ संपर्क सुलभ होणार नाही तर मोबाईलद्वारे होणाऱ्या अधिकृत संवाद, माहिती देवाण-घेवाण आणि नागरिकांशी होणारे व्यवहार हे आता संस्थात्मक स्वरूपात सुरक्षित राहतील.

नंदुरबार जिल्हा पोलीस दल नागरिकांच्या सुरक्षेसाठी, पारदर्शक आणि तंत्रस्नेही पोलिसिंगसाठी सदैव कटिबद्ध आहे.

सोबत :- अधिकाऱ्यांच्या मोबाईल क्रमांकाची यादी आहे.

प्रेषक:
जनसंपर्क अधिकारी कार्यालय,
पोलीस अधीक्षक कार्यालय,
नंदुरबार

अ.क्र	कार्यालयाचे नाव	मोबाईल क्रमांक
1.	पोलीस अधीक्षक, नंदुरबार	9028954501
2.	अपर पोलीस अधीक्षक, नंदुरबार	9028954502
3.	उपविभागीय पोलीस अधिकारी नंदुरबार उप विभाग	9028954503
4.	उपविभागीय पोलीस अधिकारी शहादा उप विभाग	9028954504
5.	उपविभागीय पोलीस अधिकारी अक्कलकुवा उप विभाग	9028954505
6.	पोलीस उप अधीक्षक (मुख्यालय), नंदुरबार	9028954506
7.	प्रभारी अधिकारी, स्थानिक गुन्हे शाखा, नंदुरबार	9028954508
8.	जिल्हा पोलीस नियंत्रण कक्ष, नंदुरबार	9028954510
9.	प्रभारी अधिकारी, नंदुरबार शहर पोलीस ठाणे	9028954512
10.	प्रभारी अधिकारी, नंदुरबार तालुका पोलीस ठाणे	9028954513
11.	प्रभारी अधिकारी, उपनगर पोलीस ठाणे	9028954514
12.	प्रभारी अधिकारी, नवापूर पोलीस ठाणे	9028954516
13.	प्रभारी अधिकारी, विसरवाडी पोलीस ठाणे	9028954517
14.	प्रभारी अधिकारी, शहादा पोलीस ठाणे	9028954518
15.	प्रभारी अधिकारी, सारंगखेडा पोलीस ठाणे	9028954519
16.	प्रभारी अधिकारी, धडगांव पोलीस ठाणे	9028954520
17.	प्रभारी अधिकारी, म्हसावद पोलीस ठाणे	9028954521
18.	प्रभारी अधिकारी, अक्कलकुवा पोलीस ठाणे	9028954523
19.	प्रभारी अधिकारी, मोलगी पोलीस ठाणे	9028954524
20.	प्रभारी अधिकारी, तळोदा पोलीस ठाणे	9028954525
21.	प्रभारी अधिकारी, शहर वाहतूक शाखा , नंदुरबार	9028954526
22.	प्रभारी अधिकारी, जिल्हा विशेष शाखा, नंदुरबार	9028954527
23.	राखीव पोलीस निरीक्षक, पोलीस मुख्यालय, नंदुरबार	9028954529
24.	प्रभारी अधिकारी,महिला सेल, नंदुरबार	9028954530
25.	प्रभारी अधिकारी, सायबर सेल, नंदुरबार	9028954535